# स्त्रीवरील अत्याचार समूळ उच्चाटनाच्या आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त प्रतिज्ञाकडून उपक्रम;

# एकजूटीने गर्भपाताविषयी आवाज उठवण्यासाठी गरज

**मुंबई, २२ नोव्हेंबर २०१९**: 'महिला व मुलींवर होणारा अत्याचार हे (VAWG) आपल्या सध्याच्या जगातील सर्वत्र पसरलेले आणि वारंवार घडणारे असे भयावह मानवाधिकार उल्लंघन आहे. अशा घटनांच्या भवताली असणारी लज्जा, लांच्छन, गुप्तता आणि शिक्षा यामुळे अशा घटनांबाबत मोठ्या प्रमाणात नोंद केली जात नाही.' – द युनायटेड नेशन्स

अत्याचार हा केवळ शारीरिकच नसतो त्याचा मनावर खूप खोलवर परिणाम होत असतो. सुरक्षित गर्भपाताला दिलेल्या नकाराच्या भोवती असलेल्या गुप्ततेमुळे अशाप्रकारचाच अत्याचार होत असतो आणि त्याबद्दल क्वचितच प्रकटपणे बोलले जाते. सुरक्षितपणे गर्भपात करण्याला केल्या गेलेल्या विरोधामुळे महिलेच्या जगण्याच्या तसेच करिअरच्या निवडीवर खूप मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. गर्भपात ही आरोग्याची काळजी घेणारी गोष्ट आहे आणि जागतिक आरोग्याच्या दृष्टीने त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वलिटी अँड सेफ अबॉर्शन हे गर्भपाताच्या भोवती असलेला कलंक आणि गुप्तता कमी करण्यासाठी काम करते. गेल्या काही महिन्यांत या संस्थांनी संयुक्तपणे एक अभ्यास (study) केला. त्यात असे लक्षात आले की, महिलांच्या आरोग्यासाठी व प्रजननासंबंधीच्या अधिकारांसाठी प्राधान्याने देण्याची मेडिकल अबॉर्शनची औषधे (एमए) केमिस्ट्सच्या दुकानांतील शेल्फवरून गतीने नाहीशी होत आहेत. भारतात गर्भपातासाठी सर्वांत प्राधान्याने वापरली जाणारी पद्धत म्हणजे एमए आहे. वर्षभरात साधारणपणे होणाऱ्या १५.६ मिलियन गर्भपातांपैकी ८१ टक्के गर्भपात हे एमए वापरून केले जातात. ही औषधेच उपलब्ध नसल्यामुळे सुरक्षित गर्भपाताच्या महिलांच्या अधिकारापासूनच त्यांना वंचित रहावे लागत आहे. विशेष म्हणजे आजही भारतात अंदाजे १० स्त्रियांचा मृत्यू असुरक्षित गर्भपातामुळे होत असतानाही देशात अशी स्थिती आहे.

भारतातील महिलांना लैंगिक समानता आणि सुरक्षित गर्भपाताचा अधिकार मिळावा यासाठी काम करणाऱ्या या अभियानाने एक असाही अहवाल (report) तयार केला, ज्यामध्ये भारतात सुरक्षित गर्भपाताचा अधिकार उपलब्ध करून देण्यामध्ये तेथील न्याय व्यवस्थेची भूमिका काय आहे याचाही अभ्यास करण्यात आला. यातून असे दिसून आले की, गेल्या तीन वर्षांत गर्भपात करण्यासाठी १९४ महिलांनी सर्वोच्च व उच्च न्यायालयांत अर्ज दाखल केले आहेत. सर्व उच्च न्यायालयांमध्ये बॉम्बे हायकोर्टात सर्वाधिक म्हणजे ८८ महिलांनी गर्भपातासाठी न्यायालयात धाव घेतल्याचे लक्षात आले. या धोक्याची घंटा देणाऱ्या अर्जांच्या मोठ्या संख्येवरून असे दिसून येते की, महिलांनी अनेकदा सुरक्षित गर्भपाताच्या त्यांच्या अधिकारासाठी उच्च न्यायालयांचे दरवाजे वाजवले. खरेतर या संख्येवरूनच दिसून येते की, महिलांच्या प्रजननासंबंधीच्या अधिकारांबाबत मार्गदर्शक तत्त्वे किंवा महिलांच्या बाजूने निकाल देण्याची संधी उच्च न्यायालयांना किती वेळा मिळाली होती पण प्रत्यक्षात तसे घडले नाही.

गर्भपाताबाबत महिलांना न्याय देण्याच्या मुद्द्याबाबत विशेषकरून महाराष्ट्राचा विचार केला तरीही या राज्यानेही लैंगिक समानतेविषयी महिलांसोबत न्याय केलेला नाही, असे अभ्यासात दिसून आले. गैरसमजुती आणि औषध नियंत्रकांकडून केले गेलेले अतिनियंत्रण यामुळे मेडिकल अबॉर्शनच्या गोळ्या बाजारातून गायबच होत आहेत. त्यामुळेच २० आठवड्यांहून कमी काळ गर्भधारणा असलेल्या महिलांना याबद्दल माहितीच नसल्याने त्या लांबलचक न्यायालयीन प्रक्रियेत अडकून न्यायालयांकडे दाद मागत बसावे लागते.

राज्यातील लैंगिक व प्रजननासंबंधी आरोग्य अधिकारांच्या वापरात सुधारणा करण्याच्या दृष्टीने हे चांगले लक्षण नाही.

**महिलांवरील अत्याचारांच्या आंतरराष्ट्रीय समूळ उच्चाटन दिनाच्या औचित्याने प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वॅलिटी अँड सेफ अबॉर्शनने मुंबईतील फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियामध्ये माध्यमांसाठी एका गोलमेज परिषदेचे आयोजन केले होते**. या गोलमेज परिषदेत सहभागी झालेल्यांमध्ये प्रतिज्ञाचे भागीदार आणि सम्यक या स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक आनंद पवार, प्रतिज्ञा कॅम्पेन ॲडव्हायजरी ग्रुप मेंबर आणि इंडिपेंडंट लॉयर ॲडव्होकेट अनुभा रस्तोगी, प्रतिज्ञा कॅम्पेन ॲडव्हायजरी ग्रुप मेंबर आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या सेक्रेटरी जनरल डॉ. कल्पना आपटे व प्रतिज्ञा कॅम्पेन ॲडव्हायजरी ग्रुप मेंबर आणि फाउंडेशन फॉर रिप्रॉडक्टिव्ह हेल्थ सर्व्हिसेस इंडियाचे सीईओ व्ही. एस. चंद्रशेखर यांचा समावेश होता. महिलांवरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांबद्दल यावेळी मुक्तपणे चर्चा झाली त्यामध्येही गर्भपाताचा अधिकार नाकारण्यासारख्या अडथळ्यांबाबतही चर्चा झाली.

रिपोर्टच्या परिणामांवर प्रकाश टाकत **प्रतिज्ञा कॅम्पेनच्या सल्लागार ग्रुपच्या सदस्य आणि भारतीय परिवार नियोजन समितीच्या महासचिव डॉ. कल्पना आपटे** म्हणाले, ''हा अभ्यास गर्भपात आणि एमए औषधांविषयी केमिस्ट्सची जागरुकता, ज्ञान व विचार जाणण्यासाठी करण्यात आला होता. महाराष्ट्रातील ४२.५ टक्के लोकांना वाटते की, कॉम्बी पॅक एमए औषधांची उपलब्धता लैंगिक पक्षपाताशी संबंधित लिंगाच्या निवडीसाठी आहे. ही चुकीची समजूत आहे की, कॉम्बी पॅक्स केवळ नऊ आठवड्यांच्या गर्भावस्थेसाठी आहे आणि भ्रुणचे लिंग जाणण्यासाठी साधारणपणे वापरण्यात येणारे व परवडणारे तंत्रज्ञान अल्ट्रा सोनोग्राफी आहे, ज्याद्वारे १३-१४ आठवड्यांच्या गर्भावस्थेमध्ये लिंग जाणता येऊ शकते. या गैरसमजूतीमुळे एमए औषधांचे गरजेपेक्षा जास्त विनियमन झाले आहे आणि गर्भावस्थेला स्वत: संपवण्याच्या सुरक्षित, साधी व परवडणा-या पद्धतीवर परिणाम झाला आहे. तसेच भारतात स्त्रियांच्या आरोग्य, कल्याण व प्रजनन संबंधित अधिकारांशी तडजोड केली जात आहे.''

आजच्या जगात आणि काळात महिलांना सुरक्षितपणे गर्भपात करू देण्यासंबंधी बंधने घालणे ही खूप मोठी विसंगती आहे. गर्भपाताला लागलेल्या कलंकाला धुवून काढण्याचे प्रतिज्ञा कॅम्पेनचे ध्येय आहे. कायदेशीर आणि सुरक्षित गर्भपात सेवा सहजपणे मिळाव्यात यासाठीही प्रयत्न करण्याची गरज आहे. हे होण्यासाठी मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी ॲक्टमध्ये सर्वसमावेशक आणि स्पष्ट अशा सुधारणा करणेही गरजेचे आहे.

**एफआरएचएस इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वॅलिटी अँड सेफ अबॉर्शनचे सीएजी सदस्य व्ही. एस. चंद्रशेखर** म्हणाले की, ''एका आदर्श संसारामध्ये विवाहित किंवा अविवाहित, प्रत्येक स्त्रीला गर्भपाताचा अधिकार असला पाहिजे. तिच्याकडे हे मान्यताप्राप्त सुविधेमध्ये करण्याचा अधिकार असला पाहिजे. दुर्दैवाने, भारतात खासकरुन ग्रामीण क्षेत्रांमध्ये गरीब लोक नि:शुल्क व कमी खर्चिक, सुरक्षित गर्भपात सेवांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. तर चांगल्या पार्श्वभूमीच्या अविवाहित महिलांकरिता देखील अशा गुणवत्तापूर्ण सुविधांपर्यंत पोहोचणे शक्य होत नाही, जेथे त्यांना न्यायमुक्त सेवा मिळतील. पोहोचण्याबाबतीत बोलायचे तर, ही एक मोठी समस्या आहे, ज्याचे कारण एमटीपी कायदा (मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनन्सी ॲक्ट, १९७१) द्वारे हे परिभाषित करण्यात येते की, वैध व सुरक्षित गर्भपात सेवा कोण पुरवू शकतो आणि कुठे पुरवू शकतो. जेव्हा एखाद्या स्त्रीला गर्भपात करायचा असतो, तेव्हा सेवा पुरवठादार ब-याचदा योग्य व अयोग्य याबाबतीत स्वत:ची मते ध्यानात घेतात. गर्भनिरोधाच्या अपयशामुळे गर्भपात इच्छिणा-या महिलांना कायदा परवानगी देतो, पण जर कुणा अविवाहित स्त्रीबाबत

असे घडले तर तिला गर्भपाताच्या कायद्यांतर्गत पर्याय दिला जात नाही. हे या कायद्याला एक मोठे आव्हान आहे.''

**प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वॅलिटी अँड सेफ अबॉर्शन बाबत:** अबाउट प्रतिज्ञा कॅम्पेन फॉर जेंडर इक्वॅलिटी अँड सेफ अबॉर्शन हे भारतात महिलांच्या अधिकारांचे रक्षण आणि सुरक्षित गर्भपातासंबंधी काळजी घेण्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे नेटवर्क आहे. महिलांचे सबलीकरण आणि महिलांना आरोग्यसुविधांचा मिळणारा अधिकार या विषयांसंदर्भात राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या संस्था, माध्यमातील संस्था आणि सरकारी संस्था यांना सल्ला देण्याचे काम या कॅम्पेनद्वारे केले जाते. फाउंडेशन फॉर रिप्रॉडक्टिव्ह हेल्थ सर्व्हिसेस इंडियाचे एक सचिवालय असून त्यामध्ये कॅम्पेन ॲडव्हायजरी ग्रुपला वाहिलेले आठ सदस्य आहेत, जे या संयुक्त प्रयत्नांना मार्गदर्शन करतात व त्यांची रणनीति आखतात. ही कॅम्पेन पुढील चार थीमवर लक्ष केंद्रित करते: अ) गर्भपाताच्या सेवा देणाऱ्या संस्था ती सेवा देत राहण्यासाठी त्यांना पाठिंबा देत राहणे, ब) बाजारपेठेत मेडिकल अबॉर्शन औषधे उपलब्ध होत राहतील यासाठी प्रयत्नशील राहणे आणि एखाद्या फॅसिलिटीशिवाय मेडिकल अबॉर्शनचे औषध घेणाऱ्या महिलेला मदत करणे, क) कायद्यातील बाबी समजून घेणे आणि त्यासंबंधी गोष्टींत लक्ष घालणे, विशेषकरून गर्भपाताच्या केसेसमधील न्यायशास्त्रात लक्ष घालणे, ड) या अभियानाचा एकत्रित आवाज बळकट करण्यासाठी व्यक्ती व संस्थांशी बळकट संबंध निर्माण करणे. कृपया अधिक माहितीसाठी www.pratigyacampaign.org येथे भेट द्या.